।। सा विद्या या विमुक्तये ।।
# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपूरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
## SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

Phone : (02462) 229574
Extension.No.143, 153

POST GRADUATION SECTION

Website: www.srtmun.ac.in
E-mail: dr.pg.srtmun@gmail.com

संदर्भ:पदव्युत्तर/प्री.पीएच.डी कोर्सवर्क/पेट २०/२०२१–२२/2043 दि. १०/०८/२०२१

## परिपत्रक

**विषय: पेट २०२० मार्फत आलोकेशन देण्यात आलेल्या संशोधक विद्यार्थ्यांच्या प्री. पीएच.डी कोर्सवर्क आयोजना बाबत.**

या परिपत्रकान्वये पीएच. डी संशोधन केंद्राचे प्रमुख, सर्व (संलग्नित महाविद्यालये), तसेच विद्यापीठ संकुले, विद्यापीठ उपकेंद्र येथिल संशोधन मार्गदर्शक व संशोधक विद्यार्थ्यांना मा. कुलगुरू महोदयाच्या आदेशान्वये कळविण्यात येते की,

१. पेट २०२० मार्फत आलोकेशन देण्यात आलेल्या सर्व संशोधक विद्यार्थ्यांसाठी प्री. पीएच.डी कोर्सवर्क चे आयोजन करण्यात आले असुन संशोधक विद्यार्थ्यांचे आलोकेशन ज्या मार्गदर्शकाकडे झालेले आहे ते मार्गदर्शक ज्या संशोधन केंद्राशी संलग्नित आहेत त्या संशोधन केंद्राचे शुल्क (रू. ५,०००/—) भरून संबंधित विद्यार्थ्यांने तिथे रूजू व्हावे.

२. संबंधित संशोधन केंद्रावर संलग्नित असलेल्या मार्गदर्शका अंतर्गत नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांसाठी कोर्सवर्कचे आयोजन सर्व संशोधन केंद्रानी करावे. जर संशोधन केंद्राकडे विद्यार्थी रूजू झाला, फिस भरली व कोर्सवर्कचे आयोजन संशोधन केंद्राने केले नाही तर विद्यार्थ्यांचे नुकसान होउ शकते. त्याची जबाबदारी संबंधित संशोधन केंद्राची असेल जर संशोधन केंद्राने कोर्सवर्कचे आयोजन केले नाही तर विद्यार्थ्यांने तसे विद्यापीठास कळवावे.

३. विद्यार्थ्यांची आलोकेशन ची तारिख हिच नोंदणीची तारिख राहिल.

४. संशोधक विद्यार्थ्यांनी संबंधित संशोधन केंद्रावर दि. २५ ऑगस्ट २०२१ पर्यंत कोर्सवर्क शुल्क रू. २,०००/— भरून प्रवेश घ्यावा. संबंधित संशोधन केंद्रानी अशा विद्यार्थ्यांना आलोकेशन पत्राच्या आधारे व संबंधित संशोधन मार्गदर्शक ज्या केंद्राशी संलग्नित आहेत अशा केंद्रावर रूजू करून घ्यावे.

५. वरील प्रमाणे दि. २५ ऑगस्ट २०२१ पर्यंत कोर्सवर्कसाठी रूजू झालेल्या विद्यार्थ्यांची यादी एक प्रत पदव्युत्तर विभाग व एक प्रत परिक्षा विभागास सर्व संशोधन केंद्रानी दि. ३१/०८/२०२१ पर्यत पाठवावी.

६. कोर्सवर्कचे शिकवणी वर्ग दि. ०१/०९/२०२१ ते दि. ३०/११/२०२१ पर्यंत संशोधन केंद्रात घेण्यात यावेत. विद्यापीठ संकुलातील संशोधक विद्यार्थ्यांचे वर्ग ऑनलाईन पध्दतीने होतील तर संलग्नित महाविद्यालयातील संशोधन केंद्रानी त्याच्या सोई प्रमाणे ऑनलाईन/ऑफलाईन पध्दतीने वर्ग घ्यावेत.

७. मा. विद्या परिषदेमध्ये झालेल्या निर्णयानुसार पेट २०२० मार्फत मार्गदर्शक प्राप्त सर्व विद्यार्थ्यांना प्रथम पीएच.डी कोर्सवर्क पुर्ण करावा लागेल. कोर्सवर्क मध्ये 1. Research Methodology 2. Computer Application 3. Research & Publication Ethics या विषयाची परिक्षा दयावी लागेल व त्याचा निकाल घोषित झाल्यानंतर, जे संशोधक पीएच.डी कोर्सवर्क मधील वरील तीन पेपर मध्ये उत्तीर्ण होतील त्यांनीच या विषयाच्या निकालाच्या प्रतीसह संशोधन आराखडा ( **Pre- Synopsis** ) विद्यापीठ पदव्युत्तर विभागात सादर करावा. जे संशोधक विद्यार्थी कोर्सवर्क उत्तीर्ण होतील त्यांनाच आर.आर.सी. मार्फत विषय मान्यता देउन नोंदणी कायम करण्यात येईल. आर.आर.सी. बैठकीचे शेडयुल विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

८. डिसेंबर २०२१ च्या पहिल्या आठवडयात कोर्सवक परिक्षा आयोजित करण्यात येईल. कोर्सवर्क परिक्षेचे वेळापत्रक परिक्षा विभागाकडुन जाहिर करण्यात येईल.

P.A.Kmuwar

सहा. कुलसचिव
पदव्युत्तर विभाग

**प्रत माहितीस्तव:**

१. मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ सविनय सादर
२. मा. प्र. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ सविनय सादर
३. मा. संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ यांना माहिती तथा कार्यवाहीस्तव सविनय सादर.